# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा. क्र. तंशिविकापु/विवि/दिव्यांगांना सवलती/२०१९-२०/ 5404 दिनांक :- 23 DEC 2019

**स्मरणपत्रः- १**

प्रति,
संचालक/प्राचार्य
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्था.

विषय :- उच्च शिक्षणामध्ये सर्व संस्थामध्ये दिव्यांगाना सर्व प्रकाराच्या सोई सवलती देण्याबाबत..

संदर्भ :- १.संचालनालयाचे पत्र क्रमांक १६ /आस्था/दिव्यागांना सवलत/२०१९/१२२ दिनांक ३०/५/२०१९
२.या कार्यालयाचे पत्र क्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/दिव्यांग/२०१९-२०/२४०८ दिनांक १७/०६/२०१९
२.उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमाक संकीर्ण-२०१९ संक्र(५५३-१९) तांशि-१ दिनांक ८/०५/२०१९
३.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक १४/०९/२०१९
४.संचालनालयाचे पत्र क्रमांक १६/आस्था/संकीर्ण/२०१९/३२१ दिनांक ७/११/२०१९

मा.उच्च न्यायालयातील जनहीत याचिका क्रमांक १०५/२०१८ मधील आदेश विचारात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने संदर्भिय शासन निर्णय क्र ४ अन्वये सर्व शासकीय संस्थांमध्ये दिव्यांगाना देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या सोई व सवलतीचा आढावा घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत सुचित केले आहे.

सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात येणार असल्याने संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार आपल्या संस्थेत दिव्यांगाना आवश्यक सोयी सुविधामध्ये प्रवेश द्वारापाशी लागून रॅम्प असावा, कॉरीडॉरमध्ये योग्य उंचीवर स्टील पाईपचे रेलींग असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह योग्य सुविधासह आवश्यक आहे.

दिनांक २७/०८/२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन विस्तृत आराखडयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा तसेच शासन निर्णयास अनुसरुन उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याकरता सुक्ष्म स्तरावर कशाप्रकारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे, याबाबतचा त्रैमासिक अहवाल दिनांक २६/१२/२०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन सदरचा अहवाल संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

संदर्भ क्र २ अन्वये या पूर्वी कार्यालयाच्या संकेतस्थळावर सदर पत्र प्रदर्शित करण्यात आले होते. त्या अनुषगाने या कार्यालयास माहिती अद्याप अप्राप्त असल्याने माहिती त्वरीत पाठविण्यात यावी.

23.12.19

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत :-

१.तंत्रशिक्षण संचालयांतर्गत संस्थामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा व अंमलबजावणीचा अहवाल.

२.दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतांना लागणा-या विविध प्रकारच्या सोयी सवलती व सुविधा मिळण्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने विविध संस्थामध्ये खालील प्रमाणे कृती आरखडा तयार करण्यांत आलेला आहे.

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/दिव्यांग/२०१९-२०/2408 दिनांक :- 17 JUN 2019

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या,
शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्था

विषय : उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याबाबत...

संदर्भ : १.संचालनालयाचे पत्र क्रमांक १६/आस्था/दिव्यांगांना सवलती/२०१९/१२२ दिनांक ३०/०५/२०१९
२.उच्चा व तंत्रशिक्षण विभाग, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/सं.क्र.(५५३-१९)तांशि-१ दिनांक ८/०५/२०१९
३.शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग दिनांक १४ सप्टेंबर २०१८

मा.उच्च न्यायालयातील जनहीत याचिका क्रमांक १०५/२०१८ मधील आदेश विचारात घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागाने संदर्भिय शासन निर्णय क्र ३ अन्वये सर्व शासकीय संस्थांमध्ये दिव्यांगाना देण्यात येणा-या सर्व प्रकारच्या सोई व सवलतीचा आढावा घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्याबाबत सुचित केले आहे.

सदर प्रकरणी सुनावणी घेण्यात येणार असल्याने संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार आपल्या संस्थेत दिव्यांगाना आवश्यक सोयी सुविधामध्ये प्रवेशद्वारापाशी लागून रॅम्प असावा, कॉरीडॉरमध्ये योग्य उंचीवर स्टील पाईपचे रेलींग असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह योग्य सुविधासह आवश्यक आहे.

दिनांक २७/०८/२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन विस्तृत आराखडयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा तसेच शासन निर्णयास अनुसरुन उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याकरता सुक्ष्म स्तरावर कशाप्रकारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे, याबाबतचा त्रैमासिक अहवाल दिनांक १८/०६/२०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन सदरचा अहवाल संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

सोबत :-
१.तंत्रशिक्षण संचालयांतर्गत संस्थामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्याबाबतच्य कार्यवाहीचा व अंमलबजावणीचा अहवाल.
२.दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतांना लागणा-या विविध प्रकारच्या सोयी सवलती व सुविधा मिळण्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने विविध संस्थामध्ये खालील प्रमाणे कृती आरखडा तयार करण्यांत आलेला आहे.

# शासकीय संस्था मध्ये दिव्यांगाना असणा-या सोई व सुविधा बाबतची माहिती

| अनु.क्र | संस्थेचे नाव | संस्थे मध्ये दिवयांगाना असणारी सोई व सवलती | संस्थेकडून सद्यस्थितीत करण्यात येत असलेली कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | | | |

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १६/आस्था/दिव्यांगांना सवलती/२०१९/922

दिनांक : 30/5/2019

प्रति,

सहसंचालक,

विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती

विषय : उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याबाबत.

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/ सं.क्र.(५५३-१९)तांशि-१, दिनांक ०८/०५/२०१९

मा. उच्च न्यायालयातील जनहीत याचिका क्रमांक १०५/२०१८ मधील आदेश विचारात घेऊन संचालक, तंत्रशिक्षण यांनी उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलतींचा आढावा घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम करावा, असे या शासनाच्या दि.२७.०८.२०१८ च्या शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आले होते,

सदर शासन निर्णयास अनुसरुन उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगाना सर्व सोई व सवतली देण्याबाबतचा विस्तृत आराखडा या संचालनालयाचे पत्र क्र १६/आस्था/दिव्यांगांना सवलती/२०१८/२३०/दि.१८/१२/१८ अन्वये शासनास सादर करण्यात आलेला आहे.(सोबत जोडण्यात आलेला आहे)

त्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील संस्थांमध्ये दि.२७.०८.२०१८ च्या शासन निर्णयास अनुसरुन विस्तृत आराखडयानुसार केलेल्या कार्यवाहीबाबतचा तसेच सदर शासन निर्णयास अनुसरून उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याकरिता सुक्ष्म स्तरावर कशाप्रकारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे, याबाबतचा त्रैमासिक अहवाल तात्काळ या संचालनालयास पाठवावा जेणेकरुन शासनास वेळेत सादर करणे शक्य होईल.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 10 JUN 2019 आवक क्र. 5507

( प्रमोद नाईक )

सहसंचालक

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

कार्यासन क्रमांक २/२अ/४/४अ/१०/१२ मुख्य कार्यालय,मुंबई यांना कळविण्यात येते की, त्यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक २७.०८.२०१८ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने तात्काळ कार्यवाही करावी

E/2018/facilities given to handicap

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी – ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.
E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १६/आस्था/दिव्यांगांना सवलती/२०१८/२३०
दिनांक : २८/१२/२०१८

प्रति,
मा. सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.

(लक्षवेध : श्री. नि.अ. पांढरकामे, अवर सचिव, महाराष्ट्र शासन)

विषय : उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याबाबत.
संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/ प्र.क्र.३०२/विशि-३, दिनांक १४.९.२०१८

महोदय,

The Right of Persons with Disabilities Act, २०१६ मधील तरतुदी, मा. सर्वोच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्रमांक २९२/२००६ मधील आदेश व मा. उच्च न्यायालयाने जनहीत याचिका क्रमांक १०५/२०१८ मधील आदेश व मा. उच्च न्यायालयाने जनहीत याचिका क्रमांक १०५/२०१८ मधील आदेश विचारात घेऊन संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्रशिक्षण यांनी उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलतींचा आढावा घेण्यासाठी कालबध्द कार्यक्रम करण्याबाबत दिनांक २७.८.२०१८ च्या शासन निर्णयान्वये आदेशित केल्यानुसार या संचालनालयाच्या अधिनस्त विभागीय सहसंचालकांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच सदर शासन निर्णयास अनुसरून उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांना सर्व प्रकारच्या सोई व सवलती देण्याकरिता सुक्ष्म स्तरावर कशाप्रकारे अंमलबजावणी करण्यात येणार आहे, याबाबतचा विस्तृत आराखडा शासनास सादर करण्यात येत आहे.

आपला,

( डॉ. अभय वाघ )
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / नाशिक / पुणे/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना असे कळविण्यात येते कि, उपरोक्त नमूद आराखडयानुसार आपल्या अधिपत्याखालील संस्थास्तरावर कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या संचालनालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

## शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/विशि-३, दिनांक २७ ऑगस्ट, २०१८ नुसार तंत्रशिक्षण संचालयांतर्गत संस्थांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्याबाबतच्या कार्यवाहीचा व अंमलबजावणीचा अहवाल.

या संचालनालयाच्या अधिनस्त असणा-या उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे नमूद केलेल्या सोयी, सुविधा व सवलती उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रवेश सवलत | : | १) व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे सक्षम प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे आहेत. प्रवेश परीक्षा आणि प्रवेश प्रक्रियेचे नोडल अधिकारी म्हणून संचालकांना नियुक्त करण्यात आले असून प्रवेश प्रक्रियेमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामध्ये दिव्यांगांसाठी ५ टक्के राखीव जागा ठेवण्यात आल्या असून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेत त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.<br>२) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या परीक्षा नियमावलीमध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ४.३.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार दिव्यांग विद्यार्थ्यांना सोई सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतची तरतुद करण्यात आलेली आहे. **(सोबत प्रत जोडत आहे)** |
| २. | प्रवेश सुलभता व विना अडथळा परिचालन | : | १) संस्थांच्या मुख्य इमारतींमध्ये प्रवेशाव्दारांमध्ये किंवा तळमजल्यावर दिव्यांग व्यक्तींसाठी रॅम्प बांधण्यात आलेले आहेत. त्यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सहजतेने ये-जा करता येते.<br>२) संस्थेच्या इमारतीमध्ये इतर विभागात वरच्या मजल्यावर जाण्याकरिता रेलिंग ची व्यवस्था करण्यात आलेली आहे.<br>३) संस्थेमधील दिव्यांग विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या सुविधाप्रमाणे प्रसाधनगृहात विशेष सोय करण्यात आलेली आहे.<br>४) संचालनालयाच्या अधिपत्याखालील काही संस्थांमध्ये दिव्यांगाकरिता वाहनतळाची सोय करण्यात आलेली आहे.<br>५) काही संस्थांमध्ये विद्यार्थ्यांना व्हिलचेअर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | परिक्षेमध्ये सुविधा | : | १) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व संस्थांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये लिहीण्याकरिता लेखणीस पुरविण्यात येतो.<br>२) संस्थेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी परिक्षेत मंडळाच्या परवानगीने उत्तरपत्रिका लिहिण्यासाठी अतिरिक्त वेळ देण्यात येतो.<br>३) दिव्यांग विद्यार्थ्यांना शक्यतो जवळचे परिक्षाकेंद्र देण्यात येते. पूर्णतः अंशतः अंध विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक परिक्षेऐवजी संबंधित विषयाची तोंडी परिक्षा घेण्यात येते.<br>४) विद्यार्थ्यांसाठी आकस्मित उपचारांची परिस्थिती निर्माण झाल्यास पुःन्हा परिक्षेची परवानगी देण्यात येते. |
| ३. | शैक्षणिक सुविधा | : | १) तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील संस्थांमधून दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता त्यांच्या सोई नुसार बैठक व्यवस्था कमी उंचीचे बैंच व डेस्क बनविण्यात आलेले आहेत.<br>२) दिव्यांग विद्यार्थ्यांनचे संस्थेमधील प्रत्येक विभागामध्ये प्रथम प्राधान्याने त्यांचे काम पार पाडली जातात.<br>३) शासन निर्णयाप्रमाणे शिष्यवृत्तीमध्ये सवलत देण्यात येतात.<br>४) तसेच काही संस्थेत नॉन फॉर्मल कोर्ससाठी सुरू असलेल्या ३ महिने व ६ महिने प्रमाणपत्र अभ्यासकमासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांना रू.६५०/- पाठयवेतन दिले जाते.यासाठी केंद्र सरकारकडून पुढीलप्रमाणे नॉन फॉर्मल अभ्यासक्रम चालविणा-यास रू.५००/- विद्यार्थ्यामागे दिले जातात. |
| ४. | अध्यापन शास्त्र व अभ्यासक्रमातील सुलभता | : | १) पूर्णतः अंध / अंशतः विद्यार्थ्यांसाठी आवाजाच्या गणक यंत्राच्या वापरासाठी परवानगी देण्यात आलेली आहे. |
| ५. | वसतीगृह सुविधा | : | १) या संचालनालयाच्या वसतीगृहांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कमोड सिस्टिम शौचायल बनविण्यात आलेले आहे.<br>२) दिव्यांग विद्यार्थ्यांना वसतीगृहांमध्ये राहण्यासाठी तळ मजल्यावर खोली उपलब्ध करून देण्यात येते.<br>३) वसतीगृहामध्ये दिव्यांग व्यक्तीसाठी रॅम्प बांधण्यात आलेले आहे. |

वेगवेगळया प्रकारच्या दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतांना लागणा-या विविध प्रकारच्या सोयी-सवलती व सुविधा मिळण्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने या संचालनालयाच्या अधिनस्त असणा-या विविध संस्थांमध्ये खालील प्रमाणे कृती आराखडा तयार करण्यांत आलेला आहे.

| अ.क्र. | दिव्यांग विद्यार्थी - प्रकार | दिव्यांग विद्यार्थ्यांना संस्थेत लागणा-या सेवा-सुविधा | सदर सेवा-सुविधांची पुर्तता कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | पुर्णतः अंध/अंशतः अंध विद्यार्थी | १. संस्थेमध्ये रॅम्पची व्यवस्था उपलब्ध करुन देणे<br>२. संस्थेमध्ये लिफ्टची व्यवस्था करुन देणे<br>३. स्क्रिन रिडींग सॉफ्टवेअर संगणक ची सुविधा उपलब्ध करुन देणे | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०२ | कुष्ठरोग निवारीत विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०३ | कर्णबधीर विद्यार्थी | वाचनीक/सुचक उपलब्ध करुन देणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०४. | लोकोमोटर डिसेबिलिटी अस्थिव्यंग/बहुविकलांगता /सेरेब्रल पाल्सी विद्यार्थी | १. Voice Synthesizer प्रणाली उपलब्ध करुन देणे.<br>२. संप्रेषण बोर्ड (Communication Board) प्रणाली उपलब्ध करुन देणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०५. | शारिरिक वाढ खुंटलेले विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था<br>२. संस्थेमध्ये लिफ्टची व्यवस्था करुन देणे | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०६. | मतीमंद/गतीमंद विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था<br>२.संस्थेमध्ये लिफ्टची व्यवस्था करुन देणे<br>३. लिहिण्यासाठी प्रोढ लेखनीकाची व्यवस्था करणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०७. | मानसिक आजार असलेले विद्यार्थी | १. विद्यार्थी आक्रमक/हिंसक बनल्यास परिस्थिती हाताळु शकेल अशा प्रर्यवेक्षकाची व्यवस्था करणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०८. | स्वमग्न विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था.<br>२.विशिष्ट प्रकारच्या पेंन्सील/पेन/ग्रीपर/गणक यंत्राची उपलब्धता करुन-देणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| ०९. | स्नायु विकृती/मेंदु व मज्जपेशी काठीन्य/मज्जा संस्थेचे तिव्र आजार असलेले विद्यार्थी / अध्यायन अक्षम/ भाषण व भाषा अक्षम विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था<br>२. संस्थेमध्ये लिफ्टची व्यवस्था करुन देणे<br>३. ऑडीओ/व्हीडीओ रेकॉर्डरची व्यवस्था उपलब्ध करुन देणे. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |
| १०. | थॅलस्सेमिया/कॅन्सर/ हिमोफीलीया /सिकल सेल /ॲसिड ॲटॅक व्हिक्टीम /पार्किंगसन्स असलेले विद्यार्थी | १. बसण्यासाठी विशेष प्रकारचे टेबल व खुर्च्यांची व्यवस्था<br>२. संस्थेमध्ये लिफ्टची व्यवस्था करुन<br>३. वेगळी बैठक व्यवस्था उपलब्ध करावी.<br>४. विशिष्ट प्रकारच्या चाक असलेल्या खुर्च्यांची व्यवस्था करण्यांत यावी. | संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ अखेरपर्यंत पुर्तता करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. |